# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०८/२०२१

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. ०४/०८/२०२१ रोजी सभा सुचना क्र. ०७ दि. ३०/०७/२०२१ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.३० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. पिठासीन अधिकारी श्री. दिनेश तेजराज जैन हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. दिनेश तेजराज जैन | सभापती |
| २. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३. | श्री. संजय अनंत थेराडे | सदस्य |
| ४. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सदस्य |
| ५. | श्रीम. सुरेखा प्रकाश सोनार | सदस्या |
| ६. | श्रीम. वैशाली गजेंद्र रकवी | सदस्या |
| ७. | श्रीम. शानु जोरावर गोहिल | सदस्या |
| ८. | श्री. कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ९. | श्री. जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| १०. | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | सदस्या |
| ११. | श्री. अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| १२. | श्रीम. गिता हरीश परदेशी | सदस्या |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| २. | श्री. सुरेश खंडेलवाल | सदस्य |
| ३. | श्रीम. सुनिता रमेश जैन | सदस्या |
| ४. | श्री. एलायस दुमिंग बांड्या | सदस्य |

मा. सभापती :-

सचिव साहेब सभेला सुरुवात करा.

नगरसचिव:-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. ०४/०८/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०७ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. 62, दि. ०५/०५/२०२१ रोजीच्या मा. विशेष स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

राकेश शहा :-

दि. ०५/०५/२०२१ रोजींच्या मा. विशेष स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

सुरेखा सोनार :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर

**प्रकरण क्र. 62 :-**

दि. ०५/०५/२०२१ रोजीच्या मा. विशेष स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. 52 :-**

दि. ०५/०५/२०२१ रोजींच्या मा. विशेष स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह** **अनुमोदक :- श्रीम. सुरेखा सोनार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 63, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मौजे नवघर सर्व्हे क्र. ३८७/२ (जुना) १५८/२,७ (नविन) या जागेवरील आरक्षण क्र. २६४ अे येथील वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणे कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. (Tender ID-2020_MBMC_540753_1) (मा. स्थायी समिती सभा दि. ०९/०७/२०२१ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ५२)

राकेश शहा :-

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार मे. आशुतोष एंटरप्रायजेस यांनी उधृत केलेले रक्कम रू. 69,32,149/- सर्वात जास्त व सर्व प्रकारचे करविरहित असल्यामुळे मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. 59, दि. 22-02-2021 अन्वये महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या वार्षिक रकमेवर शासकीय कर व 18% जीएसटी भरण्याच्या जबाबदारीवर मे. आशुतोष एंटरप्रायजेस यांची निविदा मंजूर केली. परंतु सदर वाहनतळाच्या आजुबाजुच्या परिसरातील रहिवासी व शहरातील नागरीकांच्या वाहनांची पार्कीगची सोय व्हावी व वाहतुक कोंडी दूर व्हावी यासाठी पार्कीगचे आरक्षण विकसित केले असुन या आरक्षणात पाहिल्या व दुसऱ्या मजल्यावर एकुण 66 चारचाकी वाहन पार्कीगची जागा असल्याने सदर वाहनतळाच्या आजुबाजुच्या परिसरातील रहिवासी व शहरातील नागरीकांच्या वाहनांची पार्कीगची सोय सर्व प्रथम करून तद्नंतर उर्वरीत जागेत खाजगी व्यावसायीक वाहने पार्कीगची सोय करण्यात यावी. व तसे न केल्यास सदरचा ठेका रद्द करण्यात येईल, या अटीवर मे. आशुतोष एंटरप्रायजेस यांना 3 वर्षाचे कालावधीकरीता पे ॲन्ड पार्क ठेका पध्दतीने चालविण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

सुरेखा सोनार :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

जयंतीलाल पाटील :-

3 वर्ष कसे काय ? दरवर्षी वाढणार की एकदम ठेका देणार ?

मा.सभापती :-

3 वर्षांसाठी ठेका काढला आहे. तिथे 66 वाहन पार्किंग होतात.

अनिल सावंत :-

पहिले वर्ष, दुसरा वर्ष आणि तिसऱ्या वर्षासाठी रेट सेम आहे का ?

मा. सभापती :-

त्या हिशोबानी त्यांनी केलेले आहे. टेंडर प्रोसिजरनी केले असेल.

**प्रकरण क्र. 63 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मौजे नवघर सर्व्हे क्र. ३८७/२ (जुना) १५८/२,७ (नविन) या जागेवरील आरक्षण क्र. २६४ अे येथील वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणे कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. (Tender ID-2020_MBMC_540753_1) (मा. स्थायी समिती सभा दि. ०९/०७/२०२१ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ५२)

**ठराव क्र. 53 :-**

प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार मे. आशुतोष एंटरप्रायजेस यांनी उधृत केलेले रक्कम रू. 69,32,149/- सर्वात जास्त व सर्व प्रकारचे करविरहित असल्यामुळे मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. 59, दि. 22-02-2021 अन्वये महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या वार्षिक रकमेवर शासकीय कर व 18% जीएसटी भरण्याच्या जबाबदारीवर मे. आशुतोष एंटरप्रायजेस यांची निविदा मंजूर केली. परंतु सदर वाहनतळाच्या आजुबाजुच्या परिसरातील रहिवासी व शहरातील नागरीकांच्या वाहनांची पार्कींगची सोय व्हावी व वाहतुक कोंडी दूर व्हावी यासाठी पार्कींगचे आरक्षण विकसित केले असुन या आरक्षणात पाहिल्या व दुसऱ्या मजल्यावर एकुण 66 चारचाकी वाहन पार्कींगची जागा असल्याने सदर वाहनतळाच्या आजुबाजुच्या परिसरातील रहिवासी व शहरातील नागरीकांच्या वाहनांची पार्कीगची सोय सर्व प्रथम करून तद्नंतर उर्वरीत जागेत खाजगी व्यावसायीक वाहने पार्कींगची सोय करण्यात यावी. व तसे न केल्यास सदरचा ठेका रद्द करण्यात येईल, या अटीवर मे. आशुतोष एंटरप्रायजेस यांना 3 वर्षाचे कालावधीकरीता पे ॲन्ड पार्क ठेका पध्दतीने चालविण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह** **अनुमोदक :- श्रीम. सुरेखा सोनार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 64, निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) (मा. स्थायी समिती सभा दि. ०९/०७/२०२१ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.५७)

दिपक खांबित :-

हा विषय मागे घेतलेला आहे.

मा. सभापती :-

हा विषय पुढच्या सभेमध्ये घेण्यात येईल.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 65, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ०१ ते ०६ मधील रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण (भारतीय प्रजातीची झाडे वड, कडूलिंब, पिंपल, उंबर, बकुल व इतर) करुन १ वर्ष निगा व देखभाल करणेकामी E-Tendering On-Line पध्दतीने मागविण्यात आलेल्या निविदेस मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०९/०७/२०२१ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.५५)

शानु गोहिल :-

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्या प्रमाणे मे. शितल लॅण्डस्केप ॲण्ड ॲग्रो सर्व्हिसेस यांची प्रभाग समिती क्र. 1 ते 6 मधील रस्त्याच्या दुतर्फी वृक्षारोण करून 1 वर्ष निगा व देखभाल करणेकामी वाटाघाटीअंती आलेली कमी दराची वार्षिक निविदेस रू. 75.00 लाख (रू. पंच्याहत्तर लाख मात्र) खर्च करण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे

सुरेखा सोनार :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

अनिल सावंत :-

हयांच्यामध्ये काय काय झाडे लावणार त्याचा रिपोर्ट वैगेरे दिला आहे का ?

नागेश इरकर :-

मा. सभापतीच्या परवानगीने आपल्या मनपा क्षेत्रामध्ये जे नविन रोड झाले आहेत त्या ठिकाणी वृक्षरोपण करुन 1 वर्ष निगा व देखभाल करणार

अनिल सावंत :-

तुम्ही कॅल्क्युलेट केले आहे का? किती झाड लागणार ?

नागेश इरकर :-

साधारण 2600 झाड लागतील त्याचा सर्व्हे झाला आहे.

अनिल सावंत :-

वड, उंबर, बकुळ, कडुलिंब ही झाड सगळी मोठी आहेत. तुम्ही रस्त्याच्या साईडला खड्डे करता आणि रस्त्यावर झाड लावता. वादळात जास्त नुकसान हया झाडामुळेच झाले आहे. निगा राखली जात नाही. अवाढव्य झाड वाढतात. त्यामुळे ट्रॅफिकला पण त्रास होतो.

नागेश इरकर :-

निगा राखली जाते.

अनिल सावंत :-

मग त्यांनी लॅण्ड स्केपिंग करताना काय केले आहे. आपण त्यांना पैसे देणार आहोत. झाडाची देखभाल आणि दुरुस्ती ते देखभाल करणार का ?

नागेश इरकर :-

1 वर्ष देखभाल करणार आहे.

अनिल सावंत :-

1 वर्षानंतर काय करणार.

नागेश इरकर :-

त्यानंतर आपल्या डिपार्टमेंटची माणसे देखभाल करणार आहे.

जयंतीलाल पाटील :-

मा.आमदार साहेब डिव्हायडरमध्ये जी मोठमोठी झाड लावली आहेत. ती हवा आल्यावर जी वाकली आहेत ती अजून उभी केली नाहीत. दोन वर्षापूर्वी जी आमच्या साईडला झाड लावली आहेत. ती. कोणती झाड.

नागेश इरकर :-

समुद्र फुल ते झाड चांगले आहे.

जयंतीलाल पाटील :-

त्याला पानच आहेत. फुल नाहीत. मी जेव्हा पण कटींगची गाडी मागवतो मला भेटतच नाही.

नागेश इरकर :-

सन्मा. सदस्यांनी ज्यावेळी मागीतली त्यावेळी गाडी दिलेली आहे.

जयंतीलाल पाटील :-

मी हया साहेबांना किती वेळा फोन करतो.

नागेश इरकर :-

मी त्यांना नेहमी गाडी दिलेली आहे.

जयंतीलाल पाटील :-

लोक प्रतिनिधींचा फोन उचलत नसतील तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

हसमुख गेहलोत :-

100%

जयंतीलाल पाटील :-

त्यांचे पी.ए पण फोन उचलत नाही.

मा. सभापती :-

मा. आमदार साहेब सन्मा. सदस्यांनी ज्या सूचना दिल्या आहेत त्याची अंमलबजावणी करण्यात यावी आणि गाडी उपलब्ध करुन देण्यात यावी.

**प्रकरण क्र. 65 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र. ०१ ते ०६ मधील रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण (भारतीय प्रजातीची झाडे वड, कडूलिंब, पिंपल, उंबर, बकुल व इतर) करुन १ वर्ष निगा व देखभाल करणेकामी E-Tendering On-Line पध्दतीने मागविण्यात आलेल्या निविदेस मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०९/०७/२०२१ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.५५)

**ठराव क्र. 54 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्या प्रमाणे मे. शितल लॅण्डस्केप ॲण्ड ॲग्रो सर्व्हिसेस यांची प्रभाग समिती क्र. 1 ते 6 मधील रस्त्याच्या दुतर्फी वृक्षारोण करून 1 वर्ष निगा व देखभाल करणेकामी वाटाघाटीअंती आलेली कमी दराची वार्षिक निविदेस रू. 75.00 लाख (रू. पंच्याहत्तर लाख मात्र) खर्च करण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल अनुमोदक :- श्रीम. सुरेखा सोनार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 66, प्रभाग समिती क्र. ०३ व ०४ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरीता आवश्यक त्याठिकाणी जलवाहिनी अंथरणे कामाच्या निविदेला मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०९/०७/२०२१ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.५४)

संजय थेराडे :-

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने सादर केलेल्या गोषावाऱ्यातील उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता मे. गणेश डेव्हलपर्स यांचे वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा 5.00% कमी दर प्राप्त झालेले असुन हे रास्त व वाजवी वाटत असल्याने या निविदेस सदर जल वाहिनी अंथरणे करीता अंदाजित रक्कम रू. 1,50,00,000/- पर्यंत खर्च करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) नुसार ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

राकेश शहा :-

माझे अनुमोदन आहे.

जयंतीलाल पाटील :-

काशीनगर परिसरामध्ये 4 दिवस झाले पाणी येत नाही. असे मिरारोडचा झाले आहे का वेस्टला राई, मुर्धा, मोर्वा रोजी पाणी येत.

हसमुख गेहलोत :-

माझ्या वॉर्डमध्ये पण पाण्याचा प्रॉब्लेम आहे.

जयंतीलाल पाटील :-

दुजाभाव का होतो.

हसमुख गेहलोत :-

मला 35 पत्र आला आहेत.

जयंतीलाल पाटील :-

फक्त आपल्याकडेच प्रॉब्लेम आहे. आम्ही टॅक्स भरत नाही का ?

अनिल सावंत :-

पाणी येतो ना. रिपोर्ट येतो ना.

शानु गोहिल :-

पाणी येत असेल परंतु पाण्याचे डिस्ट्रिब्युशन बरोबर नाही.

जयंतीलाल पाटील :-

प्रत्येक स्टॅन्डींगच्या मिटींगला बजेट देतो पण आमच्याकडे पाणीच येत नाही.

सुरेखा सोनार :-

पाण्याचा फोर्स नाही.

सुरेश वाकोडे :-

मा. सभापतींच्या परवानगीने पाण्याविषयी जी चर्चा चालू आहे. काही ठिकाणी पाणी येत नाही. आपल्या कडून स्टेम आणि MIDC कडून पाणीपुरवठा होतो. MIDC चा पाणीपुरवठा जून मध्ये खंडीत झाला होता. जुलै मध्ये 4 दिवस पाणीपुरवठा खंडीत झाला होता. खंडीत होण्याचे कारण जेव्हा पाऊस पडतो त्या वेळी शहाडची जी उल्हास नदी आहे त्या उल्हास नदीचा कचरा येतो आणि कचरा पंपाचर चिकटला जातो. त्यामुळे पंप बंद करून कचरा काढायला लागतो. कधी त्यामध्ये पाईपलाईन फुटण्याचे

प्रकार होतात. पाईपलाईन फुटणे आणि कचरा काढणे हया कामासाठी जूनमध्ये 8 वेळा आणि जुलैमध्ये 4 वेळा बंद झाले आहे. आपला पाणीपुरवठा 40-45 तासांवर असतो. हयांचा पाणीपुरवठा 40 तास बंद राहिला तर तो गॅप पडतो. 31 तारखेला जांभूळ जवळ त्यांची लाईन फुटली त्यामुळे 24 तास पाणीपुरवठा बंद होता. त्यामुळे तो ऑटोमॅटिक 70-72 तासांवर जातो. इंद्रलोक, जेसल पार्क, नवघर, अस्मिता, सिल्व्हर पार्क बंद होता. लोवर झोन असतात तिथे तिथे पाणीपुरवठा चालू राहतो. तो स्टेमच्या लाइनवर पाणी सुरु होतो. तेवढा पाणीपुरवठा सुरु होता. बाकी MIDC पाणीपुरवठा बंद होता. त्यामुळे पाणीपुरवठयाचे तास वाढले जातात.

जयंतीलाल पाटील :-

आमच्या पट्टयामध्येच जास्त पाणी जातो. वेस्टला प्रॉब्लेम कसा होत नाही.

सुरेश वाकोडे :-

कुठली लाईन तुटते. त्याच्यावर आहे. स्टेमची लाईन तुटली तर वेस्टला पाणीपुरवठा बंद राहिल. MIDC ची तुटली तर आपल्या कडचा ESR बंद राहतात.

जयंतीलाल पाटील :-

आमच्याकडे महिन्यातून 4 वेळा प्रॉब्लेम असतो.

सुरेश वाकोडे :-

ही लाईन आपली आहे का ? आपण त्याच्यावर डिपेंड आहे. आपल्याला त्यांनी पाणी दिल तर आपण पाणी पुरवू शकतो. एवढे प्रॉब्लेम झाले तिथे पाणी आल नाही तर पुढचा पाणीपुरवठा कसा होणार. एक दिवस शट डाऊन असेल. 72 तासांवर पाणीपुरवठा झाला. लगेच दुसऱ्या दिवशी 40 तासांवर येत नाही. त्याला 3-4 दिवस लागतात.

सुरेखा सोनार :-

दर दोन दिवसाला प्रॉब्लेम होतो आणि MIDC लाच होतो.

सुरेश वाकोडे :-

जुन्या लाईन आहेत. तिथे रिप्लेसमेंटची काम चालू आहेत. ते हायवेला लागून काम चालू आहे. त्याचे अर्धे काम झाले आहे. आणि अर्धे काम बाकी आहे. लाईन पूर्ण झाली की हा प्रॉब्लेम बंद होईल.

जयंतीलाल पाटील :-

घोडबंदरचे काम चालू केले का ?

सुरेश वाकोडे :-

त्याचे टेंडर काढले आहे . ते पुढच्या सभेत स्टँन्डींगला येईल.

जयंतीलाल पाटील :-

ते लवकरात लवकर काम पार पाडा.

सुरेश वाकोडे :-

टेंडर प्रोसेस तर कम्प्लीट करायला लागते. टेंडरशिवाय कसे करणार.

सुरेखा सोनार :-

मुंबई मनपाकडून येणारे .......

सुरेश वाकोडे :-

ते किरकोळ आहे. दीड लाख मेन इथून व्हायला पाहिजे.

जयंतीलाल पाटील :-

प्रत्येक पाण्याच्या टाकीवर फोन बंद आहेत.

सुरेश वाकोडे :-

वॉचमेन फोन उचलतो. तुम्हाला इंजिनिअर्सचे फोन नंबर दिलेले आहेत. त्यांच्याशी कॉन्टॅक्ट करा. आपल्याकडे दोन लोक टाकीवर असतात. त्याच्यात ते वॉल सोडायला गेले आणि तुम्ही फोन केला तर ते उचलणार नाही. त्यामुळे मोबाईल नंबर आहे. त्याच्यावर करा.

सुरेख सोनार :-

वॉचमनला विचारले तर तो वेगळे बोलतो.

सुरेश वाकोडे :-

त्याच्यामुळे इंजिनिअर आहे. त्याच्याशी बोला. अडचण काय आहे ते तो सांगू शकतो. वॉचमनला अडचण काय आहे ते माहित नसते.

हसमुख गेहलोत :-

ज्या ठिकाणी पाण्याची तक्रार आहे त्या नगरसेवकांना ते फेस करायला लागते. लोकांना उत्तर द्यायचे म्हणजे अंगावर घ्यायचे. कितीही केले तरी अंगावर येणारच की तुम्ही काम करत नाही. त्याच्यापेक्षा तुम्ही तुमच्या डिपार्टमेंटकडून एक परिपत्रक काढा की मग ते नगरसेवक कोणत्याही पक्षाचे असू हे ते लोकांना दाखवू शकतात की हया अडचणी आहेत.

जयंतीलाल पाटील :-

आपल्या वॉर्डमध्ये जास्त प्रकार आहेत.

हसमुख गेहलोत :-

माझ्याकडे 35 तक्रारींची लेटर आली आहेत. मी तुम्हाला पत्र देतो.

सुरेश वाकोडे :-

तुम्ही म्हणता ते बरोबर आहे.

हसमुख गेहलोत :-

आम्ही कितीही काम केले तरी कोणीही ॲप्रिशिएट करणार नाही.

गीता परदेशी :-

9 नंबर वॉर्डमध्ये नविन टाकी आहे. एक तास पाणी सोडतात त्यानंतर 2-3 तासांनी पुन्हा 1 तास पाणी सोडतात असे 3.30 तास पाणी देतात. मग ते काय सांगायचे. आज 12.00 वाजता आला तर रात्री 12.00 वाजता येईल. उद्या सकाळी येईल मग लोकांना कसे सांगू.

सुरेश वाकोडे :-

आपण ती व्यवस्था करुया.

गीता परदेशी :-

पाण्याला प्रेशर नाही. सगळयांकडून फोटो येतात.

सुरेश वाकोडे :-

एखाद्या लाईनचा प्रॉब्लेम झाला तर 2-3 दिवस तो प्रॉब्लेम राहतो. प्रेशर डेव्हलप राहत नाही.

गीता परदेशी :-

अशा पण सोसायटी आहेत जिथे सकाळी आणि संध्याकाळी दोन्ही टाईम पाणी सोडतात. टँकर मागवावे लागतात. रोज 1000-1500 टँकरसाठी देणार का ? कोरोनामध्ये लोकांना टँकर आणावे लागतात. 250 रुपयांचा टँकर मागवतात आणि घराचे काम चालवतात. 250 रुपयांच्या टँकरमध्ये कसे पाणी असते माहित आहे.

सुरेश वाकोडे :-

हा प्रॉब्लेम अस्मिता बिल्डींगला पण आहे.

हसमुख गेहलोत :-

डिस्ट्रीब्युशन समांतर करा.

सुरेश वाकोडे :-

समांतर करण्यासाठी रेग्युलर सप्लाय पाहिजे. तरच इक्वल होवू शकते. आपली 225 MLD बूक आहे. आणि आपल्याकडे 188 MLD पाणी मिळते. त्यामुळे हा गॅप राहतोच. हा गॅप राहिल्यामुळे जे उंच ESR आहेत. त्याठिकाणी जास्तच इफेक्ट पडतो. जे लोवर पोर्शन आहेत. त्यांना इफेक्ट पडत नाही. रेग्यूलर पाणी येण सुरु झाले मग ही अडचण राहत नाही.

राकेश शर्मा :-

पहले अपने को जे.ई के तरफ से मेसेज आता था की यह झोन चालू है आधे घंटे के उपर है अभी खाली झोन चालू है करके मेसेज आता है । कितने घंटे पानी आ रहा है वह नाही आता है

सुरेश वाकोडे :-

मै उसको बोलता हूँ ।

कमलेश भोईर :-

महिन्याला रेग्यूलर पाणी किती दिवस भेटते.

सुरेश वाकोडे :-

तेच तुम्हाला दाखवतो. जून महिन्यामध्ये 8 दिवस पाणी बंद होते.

कमलेश भोईर :-

परंतु पाणी बंद असते तरी बिल तेवढेच येते. बिल सरासरी लावून पाठवतो.

संजय थेराडे :-

वाकोडे साहेब महिन्याला 20 दिवस पाणी येते.

सुरेश वाकोडे :-

हा प्रॉब्लेम मिरा भाईंदरचाच नाही.

जयंतीलाल पाटील :-

हा प्रॉब्लेम आमच्याच एरियाचा आहे. काशीनगर, गोल्डन नेस्ट, नवघर रोड, वेस्टला बिल्कूल पाणी नाही.

सुरेश वाकोडे :-

MIDC चे पाणी मिरा भाईंदर साठी नाही. जांभूळवरुन पाणी सुरु होते. अंबरनाथ, बदलापूर, डोंबिवली, कल्याण, नवी मुंबई, ठाणे अशा परिसरात आहे. ज्या ठिकाणी MIDC चे पाणी आहे ते पूर्णच बंद असते.

सुरेखा सोनार :-

मुंबईला कचरा अटकत नाही इथेच का कचरा अटकतो.

सुरेश वाकोडे :-

मुंबईला कचरा येणे शक्यच नाही.

अनिल सावंत :-

मा. सभापती महोदय हा पाणीपुरवठाचा विषय आहे. संपूर्ण शहरामध्ये पाण्यासाठी बोंबाबोंब आहे. तुम्ही फक्त प्रभाग क्र. 3, 4 च का घेतले पूर्ण 6 प्रभागचे मेन्टेनंससाठी घ्यायला पाहिजे होते. जिथे कुठे अडचण असेल तर मग तुम्ही सांगाल टेंटर नाही. तुम्ही 6 प्रभागाचे घ्यायला पाहीजे होते. तुम्ही बोलले 180-190 MLD पाणी आपल्याला येते. कुठेही 24 तासांमध्ये सप्लाय होत नाही. 48 तास मिनिमम 24 तासांमध्ये 190 MLD पाणी येते आणि आपल्या शहराची भूक 250 MLD म्हणजे 48 तासामध्ये

तुम्हाला 380 पाणी येते. कुठेही 48 तासांवर सप्लाय नाही. 70 तासांवर सप्लाय जातो. 48 तासांमध्ये प्रॉपर नियोजन केले तर डिस्ट्रिब्युशन व्यवस्थित होऊ शकते. तुम्हाला 48 तासामध्ये 380 MLD पाणी येते. लोकांना 48 तासात व्यवस्थित सप्लाय दिला तर लो खुश आहेत. 24 तासामध्ये कुठेच पाणी नाही ते पाणी जात कुठे. आपल्या मिरा भाईंदरमध्ये कुठच्याही बिल्डींगला 24 तासामध्ये सप्लाय देत नाही. कुठचाही झोन घ्या. मिनिमम 48 तास त्या पिरेडमध्ये 380 MLD पाणी येत असेल. तर डिस्ट्रीब्युशन सिस्टममध्ये प्रॉब्लेम आहे. तो फाईंड आऊट करा. एक दिवस जरी शटडाऊन घेतला तरी 70 तासावर सप्लाय जायची गरजच नाही.

मा. सभापती :-

मा. आमदार साहेब जसे सावंत साहेबांनी म्हटले आहे त्यांचे कॅल्क्युलेशन बरोबर आहे त्या हिशोबाने डिस्ट्रीब्युशनमध्ये स्वत: लक्ष घालून व्यवस्थित डिस्ट्रीब्युशन करण्यात यावे.

हसमुख गेहलोत :-

पर हमको 225 MLD पाणी आना चाहिए ब्रेकडाऊन होता है किसीको जानकारी नही इसके उपर कोई बोलने को तैयार नही बोल भी लेते है तो उसपे ध्यान नही देते फॉलोअप करते है तो हर बार शहर मे पानी आता नही । प्रति दिन 225 MLD पानी हमे मिलना चाहिए । जब उन लोग की तरफ से शॉट आता हे । वो पानी वापिस से देना चाहिए वो पानी हमे मिलता नही । वाकोडे साहाब ने बताया एक महिने मे 8 दिन पानी नही आया ओर सावंत साहबने हिसाब लगाया मा. आमदार साहेब आमचे निवेदन आहे की जे 8 दिवसांचे पाणी आहे. ते कुठे गेले ते आम्हाला परत द्यायला तयारच नाही आणि ते आपली फसवणूक करतात की आपली क्षमता पूर्ण नाही म्हणून पाणी देता येणार नाही. ते ही चुकीचे बोलतात आपली क्षमता 150-200 पर्यंत आहे. तरी ते फसवणूक करुन पाणी देत नाही. जे आपले हक्काचे आहे जे शटडाऊन किंवा दुरुस्तीसाठी डुबलेले आहे ते पाणी मिळतच नाही. उसपे किसीका ध्यान नही । आज पानी नही आया तो आज का 225 तो 450 होता है । तो उसके जगह पे 200 आता है । मतलब 250 MLD पाणी आता नही।

सुरेश वाकोडे :-

साहेब हयाच्यात आपण बोलतो 48 तासांवर पाणी देतो पण आपण दोन दिवस पुरेल एवढे पाणी देतो.

सुरेखा सोनार :-

दोन दिवस पुरेल एवढे पाणी नसते.

हसमुख गेहलोत :-

आप मंडल बनाके जाना है जितना शहर का हक है उतना लेके आइए । इसमे हमारी क्या जरुरत है वो हम देने के लिए तयार है ।

**प्रकरण क्र. 66 :-**

प्रभाग समिती क्र. ०३ व ०४ मध्ये वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करणेकरीता आवश्यक त्याठिकाणी जलवाहिनी अंथरणे कामाच्या निविदेला मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०९/०७/२०२१ रोजीचे तहकुब प्रकरण क्र.५४)

**ठराव क्र. 55 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने सादर केलेल्या गोषावाऱ्यातील उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता मे. गणेश डेव्हलपर्स यांचे वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा 5.00% कमी दर प्राप्त झालेले असुन हे रास्त व वाजवी वाटत असल्याने या निविदेस सदर जल वाहिनी अंथरणे करीता

अंदाजित रक्कम रू. 1,50,00,000/- पर्यंत खर्च करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) नुसार ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. संजय थेराडे** **अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 67, श्री. शैलेश शिंदे, कनिष्ठ अभियंता यांच्या अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे. (मा. स्थायी समिती सभा दि. १२/०२/२०२१ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ५३)

अनिल सावंत :-

हा विषय काय आहे.

मा. सभापती :-

हा विषय 2-3 वेळा आपल्याकडे आला आहे. हा विषय पहिल्या स्टॅन्डिग पासून येत आहे. पण त्यांना पुढे पुढे ढकलत चालले आहे आणि ते पुढे पुढे तो वारंवार सर्व ठिकाणी विनंती करतो. त्यांनी सुट्टी घेतली होती म्हणून त्याच्यावर शास्ती लादलेली आहे. त्यांनी विनंती अर्ज दिलेला आहे. माझी शास्ती काढस त्यांचा पगार थांबलेला आहे. त्यासाठी तो विषय घेतला आहे.

अतिरिक्त आयुक्त :-

हयामध्ये प्रशासनाने गोषवारा दिलेला नाही. स्थायी समितीकडे डायरेक्ट अपील केलेले असेल. स्थयी समितीने प्रशासनाने पाठवावे प्रशासनाचे मत घ्यावे आणि पुढच्या सभेत घ्यावे.

मा. सभापती :-

स्टॅन्डिगचा अधिकार आहे.

अति. आयुक्त :-

स्टॅन्डिगचा अधिकार बरोबर आहे.

जयंतीलाल पाटील :-

स्टॅन्डिगवर लादू नका. तुमचा विषय आहे तर तुम्ही घ्यायचा ना.

अति. आयुक्त :-

त्यामध्ये प्रशासनाचे मत विचारात घेणे आवश्यक आहे.

मा. सभापती :-

आम्ही ठराव करुन पाठवतो. तुम्ही तुमच्या हिशोबाने बघा.

अति. आयुक्त :-

तुम्ही डायरेक्ट निर्णय घेतला तर प्रशासन त्याची अंमलबजावणी करणार प्रशासनाचे मत विचारात घेणार.

अनिल सावंत :-

तुमचे मत द्या.

अति. आयुक्त :-

आमच्याकडे तो विषय आलाच नाही.

अनिल सावंत :-

तुम्ही लोक असेच करता कोविड पिरेडमध्ये प्राथमिक शाळेतील शिक्षकांना ड्युटी दिली होती. त्या 6-7 शिक्षिका मेडीकल ग्राऊंडमुळे 55 वर्षांच्या वर असतील किंवा डायबिटीस असेल हायपरटेंशन असेल त्यांना सूट देण्यात आली होती असा शासनाचा GR होता असे असताना देखील शिक्षकांचे दोन महिन्याचे पगार रोखलेले आहेत. त्याचे इन्क्रिमेंट रोखलेले आहे. ती फाईल इकडून तिकडे हलवता. त्या डिपार्टमेंटमधून हया डिपार्टमेंटमध्ये अधिकाऱ्यांना दोन महिने पगार थांबला तर अधिकार ऐकतील का? मग शिक्षकांना कनिष्ठ अभियंताना कशाला वेटीस धरता निर्णय घेऊन टाकायचा.

शानू गोहिल :-

श्री. शैलेश शिंदे, कनिष्ठ अभियंता यांनी सादर केलेल्या अपिलाच्या अनुषंगे त्यांच्याकडून यापुढे त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या कामात हलर्गीजीपणा न करता वेळेत कामे करून सर्व कामे निकाली काढण्याबाबत त्यांच्याकडून हमीपत्राद्वारे लिहून घेवून त्यांचेवर महानगरपालिका प्रशासनामार्फत लावण्यात आलेल्या शास्ती रद्द करण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

सुरेखा सोनार :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

अनिल सावंत :-

मा.सभापती महोदय शिक्षकांचा विषय पुढच्या मिटिंगमध्ये घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. 67 :-**

श्री. शैलेश शिंदे, कनिष्ठ अभियंता यांच्या अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे. (मा. स्थायी समिती सभा दि. १२/०२/२०२१ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ५३)

**ठराव क्र. 56 :-**

श्री. शैलेश शिंदे, कनिष्ठ अभियंता यांनी सादर केलेल्या अपिलाच्या अनुषंगे त्यांच्याकडून यापुढे त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या कामात हलर्गीजीपणा न करता वेळेत कामे करून सर्व कामे निकाली काढण्याबाबत त्यांच्याकडून हमीपत्राद्वारे लिहून घेवून त्यांचेवर महानगरपालिका प्रशासनामार्फत लावण्यात आलेल्या शास्ती रद्द करण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल          अनुमोदक :- श्रीम. सुरेखा सोनार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 68, भाईंदर (पूर्व) झोन क्र.३ मधील वितरण व्यवस्थे अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामाच्या निविदेला मंजूरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)

राकेश शाह :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात भाईंदर (पुर्व) झोन क्र. ०३ मधील वितरण व्यवस्थे अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्यांची देखभाल दुरूस्ती करणेकरीता (अंदाजित रक्कम रू. ४९,९९,१००)

(निविदा क्र. ०४/०२) (Tender id :- 680341_1) निविदा मागविण्यात आली होती. त्यानुसार खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| | ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|---|
| १. | में. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दर वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ०.१०% कमी दराने |
| २. | में. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा २.००% कमी दराने |
| ३. | में. आशापुरा कंस्ट्रक्शन कंपनी | अंदाजपत्रक दरापेक्षा ४.९९% कमी दराने |

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता में. गणेश डेव्हलपर्स यांचे वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ०.१०% कमी दर प्राप्त झालेले आहेत. सदरचे दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना रक्कम रू. ४९,९९,१००/- पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुरेखा सोनार :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**मा. सभापती :-**

**ठराव मंजूर.**

**प्रकरण क्र. 68 :-**

**भाईंदर (पूर्व) झोन क्र.३ मधील वितरण व्यवस्थे अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामाच्या निविदेला मंजूरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)**

**ठराव क्र. 57 :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात भाईंदर (पुर्व) झोन क्र. ०३ मधील वितरण व्यवस्थे अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्यांची देखभाल दुरूस्ती करणेकरीता (अंदाजित रक्कम रू. ४९,९९,१००) (निविदा क्र. ०४/०२) (Tender id :- 680341_1) निविदा मागविण्यात आली होती. त्यानुसार खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| | ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|---|
| १. | में. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रक दर वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ०.१०% कमी दराने |
| २. | में. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा २.००% कमी दराने |
| ३. | में. आशापुरा कंस्ट्रक्शन कंपनी | अंदाजपत्रक दरापेक्षा ४.९९% कमी दराने |

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता में. गणेश डेव्हलपर्स यांचे वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा ०.१०% कमी दर प्राप्त झालेले आहेत. सदरचे दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना रक्कम रू. ४९,९९,१००/- पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदक :- श्रीम. वैशाली रकवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 69, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशनजवळ, स्कायवॉखाली येथील वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणे कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. (Tender ID 2021_MBMC_647301_1)

संजय थेराडे :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशजवळ, स्कायवॉकखाली येथील वाहनतळ ठेका पध्दतीने चालविण्याबाबत कामाची निविदा मंजूरी मिळणे बाबत गोषवारा सादर केलेला आहे. परंतु सदर गोषवाऱ्यामध्ये या वाहनतळात किती गाडया पार्कींग करण्याची जागा उपलब्ध असुन त्यानुसार अथवा जादा दुचाकी वाहने पार्कींग होता किंवा कसे याबाबत शाहनिशा करून तपशिलवार माहितीसह त्वरीत फेरनिविदा करण्यात यावी, असा ठराव मांडत आहे.

शानु गोहिल :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती.

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. 69 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशनजवळ, स्कायवॉखाली येथील वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणे कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. (Tender ID 2021_MBMC_647301_1)

ठराव क्र. 58 :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशजवळ, स्कायवॉकखाली येथील वाहनतळ ठेका पध्दतीने चालविण्याबाबत कामाची निविदा मंजूरी मिळणे बाबत गोषवारा सादर केलेला आहे. परंतु सदर गोषवाऱ्यामध्ये या वाहनतळात किती गाडया पार्कींग करण्याची जागा उपलब्ध असुन त्यानुसार अथवा जादा दुचाकी वाहने पार्कींग होता किंवा कसे याबाबत शाहनिशा करून तपशिलवार माहितीसह त्वरीत फेरनिविदा करण्यात यावी, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री.** संजय थेराडे **अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 70, मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)

मा. सभापती :-

अवलोकन मंजूर.

प्रकरण क्र. 70 :-

मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)

ठराव क्र. 59 :-

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च | ठेकेदाराचे नाव | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| 1 | २ | ३ | ४ | ५ |
| 1. | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र. २२ नयानगर मधील टेनव्हिला इमारत ते के.जी.एन टॉवर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,९०,०२६/- | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | १.०००० % कमी दराने |
| 2. | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र. २२ नयानगर मस्जिद गल्लीमधील सना अपार्टमेंट ते नासिर अपार्टमेंट पर्यंतच्या गटाराची पुर्नःबांधणी करणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,८५,४६०/- | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | १.०००० % कमी दराने |
| 3. | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र. २२ नयानगर मस्जिद गल्लीमधील शाहजाद व्हिला ते अजिजिया मदरसा पर्यंत नविन सी.सी. गटार बांधुन स्लॅब टाकणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,८५,२९९/- | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | १.०००० % कमी दराने |
| 4. | रा.म.क्र.०८ प्रभाग क्र.१४ मधील मांडवीपाडा येथील शिवमंदिर स्वामी दयानंद स्कुल रस्ता, महादेव सेवा, सोसायटी, साईधाम, सेवा सोसायटी येथे सी.सी.गटार व रस्ते बांधणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,९२,७५६/- | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | १.०००० % कमी दराने . |
| 5. | मिरारोड (पुर्व) परुळेकर जिम ते हॅप्पी होम पर्यंत गटाराची पुर्ण बांधणी करणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,७७,७४६/- | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | ७.३९०० % कमी दराने |
| 6. | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.१९ शितल पार्क इमारत ते शितल कुंज जपर्यंत गटाराची पुर्ण बांधणी करणे. (प्रभाग समिती निधी) | रु.५,४७,९३९/- | मे. निलेश रणदिवे | ४.३९०० % कमी दराने |
| 7. | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.१९ पार्श्व नगर येथील सिफनी टॉवर समोरील गटार बांधणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,९२,०२४/- | मे. निलेश रणदिवे | ४.३९०० % कमी दराने |
| 8. | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. २३ भाईंदर (प.) येथील राई गावातील राम मंदिर समोरील तलावाजवळ सेल्फी पॉईंट व जेष्ठ नागरीक कट्टा तयार करणे. (आमदार निधी) | रु.१३,३८,४४०/- | मे. प्रफुल्ल सुर्यकांत परब | १.०००० % कमी दराने |
| 9. | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (प.) उत्तन रोड, मुर्धा गाव येथील गावदेवी उद्यान सुशोभिकरण | रु.८,९२,७०९/- | मे. श्री इंटरप्रायझेस | १.०००० % कमी दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (विकसित) करणे. (आमदार निधी) | | | |
| 10. | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (प.) उत्तन चौक येथील चिमाजी अप्पा उद्यान विकसित करणे. (आमदार निधी) | रु.१३,३८,७९०/- | मे. श्री इंटरप्रायझेस | १.०००० % कमी दराने |
| 11. | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (प.) येथील श्री सालासर हनुमान उद्यान (आरक्षण क्र.१००) सुशोभिकरण (विकसित) करणे. (आमदार निधी) | रु.८,९२,६५५/- | मे. श्री इंटरप्रायझेस | १.०००० % कमी दराने |
| 12. | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरारोड (पुर्व) येथील राणी लक्ष्मीबाई उद्यान (पुनम सागर) विकसित करणे. (आमदार निधी) | रु.१३,३२,५१५/- | मे. हिमांशु ह्दयनाथ पाटील | १.०००० % कमी दराने |
| 13. | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरारोड (पुर्व) येथील आरक्षण क्र. १७८ येथील मैदान विकसित करणे. (आमदार निधी) | रु.२२,११,८९१/- | मे. श्री इंटरप्रायझेस | १.०००० % कमी दराने |
| 14. | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र. १२ इंद्रलोक फेस - ६ ग्लोबल शाळा ते गोल्डन नेस्ट शाळा पर्यंत गटार बांधणे व फुटपाथ तयार करणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,९०,०४६/- | मे. अतुल संजय साळवी | १.०००० % कमी दराने |
| 15. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. २ येथील आर.एन.पी. पार्क उद्यान आणि जैसल पार्क येथील ओस्तवाल ऑनेक्स बिल्डींग समोरील भिंत व बाहेरील बाजु सुशोभिकरण करणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,८५,७८९/- | मे. श्री गणेश इंटरप्रायझेस | १.०००० % कमी दराने |
| 16. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. ५ मध्ये सिध्दी कृपा ते नर्मदा आशिष येथे गटार रस्त्याच्या समांतर बनविणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,९१,१३९/- | मे. एम.एस. इंटरप्रायझेस | १.०००० % कमी दराने |
| 17. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. ५ मध्ये विविध ठिकाणी तुटलेल्या स्लॅब गटार, सी.सी. रस्ता, फुटपाथ याची दुरुस्ती करणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,८७,९७१/- | मे. दुर्गेश कंस्ट्रक्शन | १.०००० % कमी दराने |
| 18. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. २ मधील प्रशांत हॉटेल ते बंदरवाडी नाक्यापर्यंत फुटपाथचे नुतनीकरण करणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,५५,४३३/- | मे. इरा इंटरप्रायझेस | १.११०० % कमी दराने |
| 19. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. ३ साईबाबा नगर मधील नटवर दर्शन ते संजय पार्क सिमेंट रस्ता बनविणे. (प्रभाग समिती | रु.५,८०,२७०/- | मे. तिरुपती बालाजी इंटरप्रायझेस | १.०००० % कमी दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | निधी) | | | |
| 20. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. ४ मधील गटारे, रस्ते, स्लॅब यांची दुरुस्ती करणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,६९,९१८/- | मे. अतुल संजय साळवी | १.०००० % कमी दराने |
| 21. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. ५ हनुमान नगर मधील विकास उद्योग नगर जे ते धारा इंडस्ट्री येथे रस्त्याचे पुर्नःपृष्ठीकरण करणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,८७,१४०/- | मे. आर.जे.इन्फ्रास्ट्रक्चार | १.०००० % कमी दराने |
| 22. | भाईंदर (पुर्व) प्रभाग समिती क्र. ३ अंतर्गत संत तुकाराम महाराज मार्गावरील प्रफुल्ल पाटील चौक (प्रतिक्षा इनक्लेव्ह इमारती समोर) हाय टेन्झव येथे सुंदरीकरण करणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,८८,२५७/- | मे. पंकज इंटरप्रायझेस | १.०००० % कमी दराने |
| 23. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. ११ मधील साईश्रध्दा चाळ येथे गटाराचे काम करणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,८७,९४०/- | मे. विवान इन्फ्रा प्रोजेक्ट | १.०००० % कमी दराने |
| 24. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. ११ मध्ये विविध ठिकाणी दिशादर्शक बोर्ड लावणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,९२,०००/- | मे. तिरुपती बालाजी इंटरप्रायझेस | १.०००० % कमी दराने |
| 25. | भाईंदर (प.) प्रभाग क्र. ०८ मधील सिध्दीविनायक मार्ग येथे सतीश अपार्टमेंट ते शुभम अपार्टमेंट येथे सी.सी. रस्ता बनविणे व स्लॅब दुरुस्ती करणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,७९,३२५/- | मे. श्री लक्ष्मी कंस्ट्रक्शन | १.०००० % कमी दराने |
| 26. | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र. १७ मधील पुनम कॉम्पलेक्स शांती पार्क समोरील चौकात सेल्फी पॉईंट बांधणे. (नगरसेवक निधी) | रू.५,७०,०००/- | मे. एन.जे. ब्रदर्स | १.२५०० % कमी दराने |
| 27. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. १३ मधील वेलकर नगर, घोडबंदर येथे स्मशानभूमी बनविणे. (आमदार निधी) | रु.८,९२,८३२/- | मे. कृती इन्फ्रा. | १.०००० % कमी दराने |
| 28. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. १२ मधील आरक्षण क्र. २४२ येथे खुली अभ्यासिका बांधणे. (आमदार निधी) | रु.१७,८१,६४१/- | मे. कृती इन्फ्रा. | १.०००० % कमी दराने |
| 29. | भाईंदर (प.) प्रभाग क्र. ०१ मधील शास्त्री नगर, नेहरु नगर येथे गटार व सी.सी. रस्ते करणे. (प्रभाग समिती निधी)(फेर निविदा) | रू.८,८४,१८७/- | मे. श्री सालासर कंस्ट्रक्शन कं. | १.०००० % कमी दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 30. | ओवळा माजिवडा मतदार संघातील मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ११ मधील एस.एन. कॉलेज समोरील तलावाशेजारील जागेत खुली अभ्यासिका बांधणे. (आमदार निधी) | रु.१७,८१,६४१/- | मे. विवान इन्फ्रा प्रोजेक्ट | १०.२००० % कमी दराने |
| 31. | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २३ डि-मार्ट परिसरात सेल्फी पॉईंट तयार करणे. (प्रभाग समिती निधी) | रु. ८,९१,०७२/- | मे. दुर्गेश कंस्ट्रक्शन, | १.०६०० % कमी दराने |
| 32. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. ३ मधील कस्तुरी पार्क येथील टॉनी टॉईझच्या शाळे समोर सुंदरीकरण करणे व ओशियन पॅलेस येथे वॉलचे बांधकाम करणे. (प्रभाग समिती निधी) | रु.६,३२,६१४/- | मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | १.०००० % कमी दराने |
| 33. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र.०२ मधील जैसल पार्क चौपाटी वरील गुलाब बाग येथे स्टेनलेस स्टीलची ग्रील बसविणे व पेव्हर ब्लॉक दुरुस्ती करुन सी.सी. करणे. (नगरसेवक निधी) (फेर निविदा) | रु.८,४०,७७९/- | मे. इरा इंटरप्रायझेस | १.०१०० % कमी दराने |
| 34. | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २४ मधील उत्तन स्मशानभूमी येथे विधी शेडचे बांधकाम करणे. (प्रभाग समिती निधी) (फेर निविदा) | रु.८,८५,८५२/- | मे. साईराज कंस्ट्रक्शन | ०.९९०० % कमी दराने |
| 35. | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २४ मध्ये वॉटर कुलर बसविणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,९२,७४२/- | मे. समृध्दी ट्रेडिग कंपनी | १.०००० % कमी दराने |
| 36. | मिरारोड (पुर्व) विजयपार्क ते विनय रेसिडेन्सी इमारत पर्यंत रस्ता समांतर गटार बांधणे. (प्रभाग समिती निधी) | रु.८,८६,२८६/- | मे. निलेश रणदिवे | १.०००० %कमी दराने |
| 37. | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.१७ मध्ये विविध ठिकाणी ओला व सुका कचयांचे एच.डी.पी.ई. मेटेरियलचे व लॉकिंग सिस्टीम असलेले ५० लिटर क्षमतेचे पोल माऊटिंग डब्बे बसविणे. (प्रभाग समिती निधी) | रु.६,००,०००/- (जी.एस.टी. सहीत) | मे. मुस्कान इंटरपव्रायझेस | ४.२९०० %कमी दराने |
| 38. | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.१७ मधील ग्रीन पार्क प्रवेशव्दाराजवळ वर्टीकल गार्डन व सेल्फी पॉईंट बनविणे. (नगरसेवक निधी) | रु.८,५६,६५०/- | मे. अतुल संजय साळवी | ०.१७०० % कमी दराने |
| 39. | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.२१ मध्ये आवश्यक त्या ठिकाणी दिशादर्शक फलक बसविणे. (नगरसेवक निधी) | रु.९,००,०००/- | मे. मेरु कंस्ट्रक्शन | १.०००० % कमी दराने |

**वरील निविदांना मा. आयुक्त यांनी जी.एस.टी. सह मंजूरी दिलेली आहे. सदर कामांचे मा. स्थायी समितीमध्ये अवलोकन करण्यात आले.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण् क्र. 71, मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग)

मा. सभापती :-

अवलोकन मंजूर.

**प्रकरण क्र. 71 :-**

मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. 60 :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागणविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहे**.**

| **अ.क्र** | **कामाचे नाव** | **अंदाजित रक्कम (रु.)** | **कंत्राटदाराचे नाव** | **मंजूर निविदा रक्कम** |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक वापराच्या विहीरींची साफसफाई व दुरुस्ती करणे. | रु.24,74,400/- | मे. ओमकार इंटरप्रायजेस | रु.24,37,284/- |
| 2. | मिरारोड (पुर्व), क्विन्स पार्क रोड येथील क्विन्स वृदांवन ते क्विन्स कोर्ट पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.6,32,000/- | मे. गणेश डेव्हलपर्स | रु.6,19,360/- |
| 3. | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या पाली येथील पंप गृहात नवीन स्टँड बाय पंपाचा पुरवठा, उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वित करणे. | रु.24,00,000/- | मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | रु.23,52,000/- |
| 4. | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या जनता नगर येथील पंप गृहात नवीन स्टँड बाय पंपाचा पुरवठा, उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वित करणे. | रु.15,00,000/- | मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | रु.14,70,000/- |
| 5. | पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती व वितरण व्यवस्था सुरळीत ठेवणेसाठी जेसीबी मशिन पुरवठा करणे. | रु.15,76,575/- | श्री. मुजाहीद रियाझ हाजी | रु.1100/- प्रति तास |
| 6. | मिरारोड (पुर्व), दिपक हॉस्पीटल रोडवरील सेव्हन इलेव्हन हॉस्पीटल ते ज्युपीटर बिल्डिंग पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.15,23,600/- | मे. गणेश डेव्हलपर्स | रु.14,93,128/- |
| 7. | मिरारोड (पुर्व), हटकेश उद्योग नगर जवळील गौरव व्हॅली येथील जे.पी.इन्फ्रा ते जे.के.डेव्हलपर्स पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.16,11,300/- | मे. गणेश डेव्हलपर्स | रु.15,79,074/- |
| 8. | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदरपाडा सिग्नलच्या पुढील कल्व्हर्ट नं. 2 चे | रु.21,80,996/- | मे. एस.बी.खकाल | रु.21,80,996/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | बांधकामात बाधीत होत असलेली मिरा भाईंदर महानगरपालिकेची 1350 मि.मी. व्यासाची स्थलांतरीत करणे. | | | |
| 9. | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या उत्तन येथील धावगी डोंगर येथे पंप गृहाची उभारणी करणे तसेच नवीन पंपाचा पुरवठा, उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वित करणे. | रु.24,57,000/- | मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | रु.23,34,150/- |
| 10. | मिरारोड (पुर्व) पुजा नगर येथील निहाल कॉर्नर ते सिता स्मृती पर्यंत 400 मि.मी. व्यासाची डी.आय. जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.24,97,900/- | श्री. मुजाहीद रियाझ हाजी | रु.23,73,005/- |

वरील कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (ड) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण् क्र. 72, प्रतिवृत्त सादर करणेबाबत. (वैद्यकीय विभाग)

मा. सभापती :-

प्रतिवृत्त मंजूर.

उपमहापौरांनी मागच्या मिटिंगमध्ये एक झाडचा विषय होता आणि दुसरा विषय डॉक्टरांचा. त्यांच्यावर आपण अजून काही कारवाई केलेली नाही.

हसमुख गेहलोत :-

मा.आमदारांना लक्षात असेल की वन रुपी क्लिनिककडून माफीनामा लिहून घ्यायचा आहे असे मला आश्वासन दिले होते. त्यांनी मनपा अधिकाऱ्यांचे आणि लोकप्रतिनिधीच्या नावाचे हनन केलेले आहे. महानगरपालिकेला वेठीस धरुन त्यांनी ते मिडियामध्ये पसरवले होते. ते चुकीचे होते. सावंत साहबको याद होगा की जब तक वो माफीनामा नही देता उसका पैसा नही देंगे । उसका पैसा बाकी है ।

अति. आयुक्त :-

हयाच्यामध्ये वन रुपी क्लिनिकचा जो कॉन्ट्रक्टर आहे त्याच्या नावात वन रुपी क्लिनिक आहे त्याला आपण नोटीस दिली होती की सोशल मिडीयावर तुम्ही अशाप्रकारे वक्तव्य केले आहे त्यांनी खुलासा केलेला आहे की असे त्यांनी काही केलेले नाही.

हसमुख गेहलोत :-

सर मी तुम्हाला लेखी दिले होते.

अनिल सावंत :-

तुम्ही चौकशी काय केली.

मा. सभापती :-

तुम्ही सांगितले त्याच्याकडून माफीनामा लिहून घेऊ.

हसमुख गेहलोत :-

माझ्या नावाने लोक बोंबाबोब करतात. हसमुख म्हणजे टेक्नीकल माणूस. मी हा पुरावा आपल्या डिपार्टमेंटला दिला होता. ट्वीटर म्हणजे आजच्या घडीला पहिले सोशल मिडीया. तो बोलतो की मी पेशन्टला फ्री देणार. त्यांनी पर बेडचे 162 रुपी खाट आणि 740 पर डे घेतले आणि हा बोलतो मी फ्री ऑफ कॉस्ट देतो.

अति. आयुक्त :-

आपण त्याला दिलेले आहेत अजून त्याला कुठलेही बिल दिलेले नाही. आपण ते देऊ करणार होतो कारण आपण त्याच्यासोबत ॲग्रीमेंट केले आहे. त्याचे म्हणणे असे की नागरिकांकडून मी घेत नाही. मनपा नागरिकांना फ्री देते.

हसमुख गेहलोत :-

हा कोण बोलणारा.

शानु गोहिल :-

साहेब तुम्ही सपोर्ट करता.

अति. आयुक्त :-

आपण त्याला नोटीस दिली आहे.

मा. सभापती :-

आपण जेव्हा टेंडर प्रोसिजर केली होती. त्याच्यामध्ये अट टाकलेली आहे का ? की ट्वीटरमध्ये ॲडव्हटाइज करु शकतो. तो जाहिरात करु शकतो अशी त्याला सूट दिली आहे का ?

हसमुख गेहलोत :-

काही सूट दिलेली नाही. वो ऐसे बोल रहा है । मैं फोकस करके दे रहा हू in association with MBMC इसका अर्थ क्या होता है ।

अनिल सावंत :-

मनपा नं. 2

हसमुख गेहलोत :-

सर वो क्या फोकट मे करके दे रहा है क्या ?

अति. आयुक्त :-

नही. पेमेंट ले रहा है ।

हसमुख गेहलोत :-

740 रुपया लिया लेकीन उसके निचे क्या लिखा है। अधिकारी चोर नगरसेवक चोर. साहेब आम्ही काय चुकी केली आहे. सगळ क्रेडीट तो घेऊन गेला. अधिकारी चोर लोकप्रतिनिधी चोर झाले. त्यांनी हे दाखवले की मी लोकांसाठी फ्री ऑफ कॉस्ट करतो. लोकांसाठी कुठे 740 रुपग्र प्रति डे पर बेड. त्यांनी सोशल मिडीया ट्वीटर, फेसबुकवर अगदी ठणठणीतपणे ॲडव्हटाइजमेंट केली.

अति. आयुक्त :-

त्याचा खुलासा आला आहे. त्याच्यावर त्या बाबी नव्याने तपासून घेतो.

हसमुख गेहलोत :-

कुठल्या अधिकाऱ्याने पैसे दिले तर माझा आक्षेप आणि आरोप असेल. आम्ही लोकप्रतिनिधींनी काही मागणी केली नाही. एवढी मागणी केली आहे. तो बोलतो ना की मी फ्रीमध्ये केले आहे तर मी फुकटमध्ये केले नाही. मला महानगरपालिकेनी एवढे पैसे दिले आहेत हे जे मी दिले आहे ते चुकुन दिले

होते. मी पैसे घेतलेले आहेत. मनपानी फुकट दिले आहे अशी जाहिरात द्यावी आणि सोशल मिडियावर टाकावे.

अति. आयुक्त :-

त्यांनी चुकीचे स्टेटमेंट केले असेल.

अनिल सावंत :-

केलच आहे तुम्ही अजूनही म्हणता असेल का.

अति. आयुक्त :-

असेल नाही. त्यांनी जे ट्वीटर केले आहे त्यांन हे दाखवू की आमच्या कडे हा पूल आहे हया अनुषंगाने.

हसमुख गेहलोत :-

हे दिलेले आहे. आपण त्याच्याकढे काय मागणी केली आहे. फक्त माफीनामाच मागितला आहे ना. त्यामध्ये एवढे लोकप्रतिनिधी काय करत नाही पैसे खातात. अधिकारी काही करत नाही. पैसे खातात.

अति. आयुक्त :-

7 मे ला आपण नोटीस दिली होती. कोविड-19 मध्ये रुग्णांवर उपचार करणेकामी मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये स्वर्गीय मिनाताई सभागृहात DCHC चालू करण्यात आली असून सदर DCHC चालू करण्यात आली असून सदर DCHC चालविण्याकरीता प्रति बेड प्रतिदिन 740 सर्व करांसहित हयाप्रमाणे 162 ऑक्सिजन खाटांकरीता जा.क्र./मि.भा.मनपा/वै.267/2021-22, दि. 22/04/2021 रोजी आपणांस कार्यादेश देण्यात आलेला आहे. तरी स्वर्गीय मिनाताई ठाकरे सभागृह DCHC येथे कोविड रुग्णांना वन रुपी क्लिनिक हया नावाने निशुल्क सेवा आपल्यामार्फत मनपा पुरवीत असलेबाबत प्रसार माध्यमे आणि सोशल मिडियामध्ये प्रसिध्दी केल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. परंतु मनपामार्फत आपल्या कार्यादेशात नमूद केल्याप्रमाणे प्रति दिन प्रति बेड 740 रुपये हयाप्रमाणे स्वर्गीय मिनाताई ठाकरे सभागृह DCHC इथे उपचारार्थ दाखल झालेल्या रुग्णांकरीता शुल्क अदा करण्यात येत असूनही आपण सोशल मिडिया आणि प्रसार माध्यंमांध्ये वन रुपी क्लिनिक निशुल्क सेवा अशा प्रकारची प्रसिध्दी केल्याने जनतेची दिशाभूल होऊन संभ्रम निर्माण होत आहे. तरी सदरबाबत लेखी खुलासा दोन दिवसांत सादर करावा. तसेच उपरोक्त बाबींबाबत आपणांमार्फत प्रसिध्द करण्यात आली असल्यास तसा लेखी माफीनामा लिहून आपण स्वत: सदर माफीनामा विविध प्रसार माध्यमांवर तातडीने प्रसारित करावा. अन्यथा आपल्यावर मनपाची प्रतिमा मलिन केल्याने नियमानुसार कारवाई करण्यात येईल अशी स्पष्ट नोंद घेण्यात यावी अशी नोटीस दिली आहे.

अनिल सावंत :-

त्याचा खुलासा कधी आला.

अति. आयुक्त :-

7 जूनला आला.

हसमुख गेहलोत :-

हयाच्या अगोदर कधी मिटिंग झाली.

नगरसचिव :-

10-15 दिवस अगोदर.

हसमुख गेहलोत :-

सदस्य को अंधेरे मे रख रहे है ।

अति.आयुक्त :-

मिटिंगच्या वेळी जेव्हा MOH ला बोलावले होते तेव्हा ते टेंभाला गेले होते.

हसमुख गेहलोत :-

त्या मिटिंगला असे सांगितले होते की त्याचा खुलासा अजून आलेला नाही. त्याला पैसे दिले का ?

अति. आयुक्त :-

पैसे बाकी आहेत पैसे दिले नाहीत.

अनिल सावंत :-

तुम्ही आयुक्त म्हणून असता आणि पूर्ण माहिती घेत नाही. अधिकारी तुम्हाला व्यवस्थित माहिती देत नाही. तुम्हाला सर्व विषयाची माहिती पाहिजे.

हसमुख गेहलोत :-

किती पैसे बाबी आहेत.

डॉ.प्रकाश जाधव :-

25 लाख बाकी आहेत.

हसमुख गेहलोत :-

साहेब ॲज अ जज म्हणून ल्याला बोलवा हिअरिंग लावा.

अति. आयुक्त :-

ठीक आहे. त्याला बोलावून घेऊ.

अनिल सावंत :-

मा.सभापती महोदय यह साल चालू होके ऑगस्ट आ गया । वैसे भी कोविड मे कुछ काम नही हो रहे । नगरसेवक निधी और प्रतिनिधी के काम नही हो रहे वो बोलते है फंड है नही । आम्ही बजेट मध्ये एवढी मोठी प्रोव्हिजन दिली आहे.

मा. सभापती :-

बजेटमध्ये नगरसेवक निधी आणि प्रतिनिधीचे प्रोव्हिजन केले आहे. जर त्याच्यामध्ये स्पिल ओव्हरच्या हिशोबाने काय प्रोब्लेम असेल तर पुन:र्विनियोजनासाठी पुन्हा विषय पाठवा. पण नगरसेवक आणि प्रतिनिधीचे काम करुन घ्या. लोक आम्हांला बोलतील गेल्या वर्षी कोरोनामुळे काम नाही केले आणि पुढे इलेक्शन आहे. मला वाटते स्पिल ओव्हरच्या हिशोबाने काम थांबलेले आहे. जे काय असेल ते आपण करुन देऊ पण नगरसेवक निधी प्रतिनधी महापौर निधी उपमहापौर निधीची काम करण्यात यावी आणि मार्गी लावण्यात यावे.

दिपक खांबित :-

गेल्यावर्षीची काम आता काढली.

अनिल सावंत :-

गेल्या वर्षीची आता काढली मग हया वर्षीची कधी काढणार ?

अति. आयुक्त :-

04/05/2020 ला शासनाने जी आर काढला होता.

अनिल सावंत :-

शासनाने कोविड संपल्यावर शासनानी सांगितले काम करा.

दिपक खांबित :-

पुढच्या वर्षीच काम करु.

अनिल सावंत :-

हया वर्षीची हया वर्षी व्हायला पाहिजेत. प्रभाग समिती आता अस्तित्वात नाही. आयुक्तांना अधिकार आहे तुम्ही ती काम सॅक्शन करा.

दिपक खांबित :-

समिती नसते तेव्हा अधिकार महासभेला असतात.

अनिल सावंत :-

महासभेला रेकमेंड करा.

मा. सभापती :-

महाराष्ट्र गव्हर्नरमेंटचा एक जी.आर आलेला आहे ते जोपर्यंत प्रभाग समिती नविन होत नाही तोपर्यंत तेच अध्यक्ष कन्टीन्यु राहणार आहेत. तसा जी.आर आहे. महाराष्ट्र गव्हर्नरमेंटच्या जी.आर हिशोबाने ते करु शकतात.

हसमुख गेहलोत :-

मा.सभापती महोदय वो सिर्फ पद उसमे कुछ मी कारवाई नही कर सकते.

मा.सभापती :-

त्याच्यात लिहिले आहे की कोणतेही काम थांबणार नाही म्हणून जी कमिटी अस्तित्वात आहे ती पुढे राहणार ते डिसीजन घेऊ शकतात तसा पत्रामध्ये आदेश आहे. ते सचिवाला पूर्ण माहित आहे त्याचे मानधन आहे त्यासाठी पण मी पत्र ठेवले की त्यांना जर आदेश आहे तर त्यांना मानधन देण्यात यावे.

**प्रकरण क्र. 72 :-**

प्रतिवृत्त सादर करणेबाबत. (वैद्‌यकीय विभाग)

**ठराव क्र. 61 :-**

कोविड-19 संसर्गाच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने केलेल्या खर्चाचे प्रतिवृत्त महानगरपालिका वैद्‌यकीय विभागामार्फत स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले असून, सदर प्रतिवृत्ताचे अवलोकन करण्यात येत आहे

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका.**

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. 12.20 वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका